# मुंबई विद्यापीठ

विशेष कक्ष/स्थायी समिती/(१४)/१४८ /२००४.
दिनांक २८ डिसेंबर,२००४.

परिपत्रक

सर्व प्राचार्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी महाविद्यालयामध्ये सल्लागार समिती स्थापन करण्याबाबत पत्र क्र.बीसीसी/१९७/२००१ दिनांक ११ जून, २००१ व विशेष कक्ष/स्थायी समिती/२९८/२००३ दिनांक ११ जुलै, २००३ अन्वये कळविण्यात आले होते.

ज्या महाविद्यालयात अशाप्रकारे सल्लागार समिती गठीत करण्यात आली नसेल त्या महाविद्यालयात त्वरीत अशी समिती गठित करण्यात यावी, व समितीच्या सदस्यांची नावे विद्यापीठास कळविण्यात यावीत आणि समितीच्या बैठकीचे इतिवृत्त विद्यापीठास वेळोवेळी पाठविण्यात यावे.

मान. कुलगुरुंच्या आदेशानुसार त्यांना कळविण्यात येते की, शिष्यवृत्ती विषयक मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या तक्रारी तसेच मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या तक्रारी प्रथम महाविद्यालयाच्या सल्लागार समितीपुढे ठेवण्यात याव्यात. ज्या महाविद्यालयात मागासवर्गीय विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या तक्रारी असतील अशा महाविद्यालयातील सल्लागार समितीच्या बैठकांना विद्यापीठाच्या स्थायी समितीचे एक सदस्य व विशेष कक्षाचे उपकुलसचिव (स्थायी समितीचे सदस्य सचिव) यांना निमंत्रित करण्यात यावे व त्यांच्या उपस्थितीत बैठक आयोजीत करण्यात यावी. सदस्यांचे नाव विशेष कक्षातर्फे महाविद्यालयास कळविण्यात येईल.

कुलसचिवांकरीता,

मुंबई-४०० ०३२.
दिनांक २८ डिसेंबर २००४.

प्रति,

संचालक/प्राचार्य, सर्व संलग्नीत अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, विधी, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, औषध निर्माण शास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त पदव्युत्तर संस्था.

उपकुलसचिव (संलग्नता/घटक महाविद्यालये) यांना माहितीकरीता रवाना.

कुलसचिवांकरीता,